Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

आईच्या मायेने दिले जीवनदान!
(पान २ वर)



। सोमवार, दि. १८ मे २०२६ । वर्ष १ । अंक ४३ । पाने २।
DIGITAL EDITION

## कृषी क्षेत्रातील १८ नवकल्पनांना विशेष मदत; प्रथम पुरस्काराला अजित पवार यांचे नाव

# महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉनची घोषणा!

### पुढील टप्प्यात शासनामार्फत विशेष मार्गदर्शन आणि मदत देण्यात येणार : मुख्यमंत्री फडणवीस

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई ।: राज्यातील कृषी क्षेत्र अधिक आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पुढील वर्षापासून ‘पुणे ॲग्री हॅकेथॉन’च्या धर्तीवर राज्यस्तरीय ‘महाराष्ट्र ॲग्री हॅकेथॉन’ आयोजित करण्यात येणार असून, या स्पर्धेतील प्रथम पुरस्कार दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नावाने दिला जाईल.**

, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. कृषी विभागाच्या वतीने कृषी महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या ‘पुणे ॲग्री हॅकेथॉन’च्या समारोप व पारितोषिक वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, हेमंत रासने यांच्यासह कृषी आणि शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, “शेती अधिक उत्पादनक्षम आणि भविष्योन्मुख करण्यासाठी




आधुनिक संशोधन आणि नवकल्पनांची जोड अत्यावश्यक आहे. कृषी नवसंकल्पना स्पर्धा या केवळ स्पर्धा नसून भविष्यातील कृषी व्यवस्थेला दिशा देणारे उपक्रम आहेत.” त्यांनी पुढे सांगितले की, पुणे ॲग्री हॅकेथॉनला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता पुढील वर्षापासून ही स्पर्धा राज्यव्यापी करण्यात येणार आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आणखी एक महत्त्वाची घोषणा करत सांगितले की, पुणे ॲग्री हॅकेथॉनमधील निवडक १८ नवकल्पनांना पुढील टप्प्यात शासनामार्फत विशेष मार्गदर्शन आणि मदत देण्यात येणार आहे. त्यापैकी किमान १२ प्रकल्प प्रत्यक्ष बाजारात उतरावेत यासाठी सरकार प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेची सुरुवात झाली. बदलत्या काळात शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक असून, अशा उपक्रमांमुळे कृषी क्षेत्रात नवे प्रयोग आणि स्टार्टअप संस्कृतीला चालना मिळणार आहे.

### विभागनिहाय विजेते जाहीर

मृदा आरोग्य व व्यवस्थापन : विजेता – किसान साथी | उपविजेता – नॅनो वीटा स्मार्ट जल व्यवस्थापन व स्वयंचलन : विजेता – आयओएच अभियंता समूह | उपविजेता – फार मोअर कृषी यांत्रिकीकरण व कृत्रिम बुद्धिमत्ता : विजेता – एग्रीटेक नेक्सस | उपविजेता – टीम व्हीएनएमकेव्ही कृषी प्रक्रिया व मूल्य साखळी : विजेता – विन विन बाईट्स | उपविजेता – सिल्कस्कॅन इनोव्हेटर्स अक्षय ऊर्जा व कृषी कचरा व्यवस्थापन : विजेता – प्रोटो फीड्स | उपविजेता – इको एक्सट्रॅक्ट पीक संरक्षण व कीड व्यवस्थापन : विजेता – स्मार्ट बायो एआय | उपविजेता – ग्रीन माइंड्स स्मार्ट कृषी प्रशासनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता : विजेता – ई-पिक ऑडिट एआय | उपविजेता – कृषी प्रबंध राज्य सरकारच्या या निर्णयामुळे कृषी क्षेत्रातील नवसंशोधनांना नवी चालना मिळणार असून, युवा संशोधक आणि स्टार्टअप्ससाठी महाराष्ट्रात मोठ्या संधी निर्माण होणार असल्याचे मत कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केले.

---

Selected

## शासकीय सेवेतील डॉक्टरांवर सरकार मेहेरबान

**मुंबई:** राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत कार्यरत गट-अ मधील वरिष्ठ डॉक्टरांबाबत महत्त्वपूर्ण आणि सकारात्मक निर्णय घेतला आहे. वयाच्या ५०/५५ वर्षांनंतर अथवा ३० वर्षांच्या सेवेनंतर करण्यात आलेल्या सेवा पुनर्विलोकन प्रक्रियेत पात्र ठरलेल्या डॉक्टरांची सेवा पुढेही सुरू ठेवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. (४) आणि ६५ नुसार, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अकार्यक्षम किंवा संशयास्पद सचोटी असलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याचे धोरण शासनाकडे आहे. या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय पुनर्विलोकन समिती स्थापन करण्यात आली होती.

---


जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## झाडे अचानक सुकल्याने खळबळ!

### पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची भीती

**जन सम्राट टाईम्स**

**कल्याण | प्रतिनिधी:** राज्यात सध्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असून समृद्धी महामार्ग तसेच अहमदाबाद महामार्गासारख्या विविध विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल केली जात आहे. यामुळे नागरिकांना वाढत्या उष्णतेचा सामना करावा लागत असतानाच कल्याणजवळील मोहने परिसरातील एनपीएल कंपनीच्या आवारात मोठ्या प्रमाणावर झाडे अचानक सुकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संभ्रम आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. परिसरातील अंदाजे १०० ते १५० झाडे काही दिवसांतच पूर्णपणे वाळल्याचे दिसून येत असून, येत्या काळात परिसरातील इतर झाडांनाही धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकारामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, इतक्या मोठ्या प्रमाणावर निलगिरीची झाडे अचानक सुकणे ही सामान्य बाब नसून काही ठिकाणी रासायनिक पावडर किंवा केमिकलचा वापर करून झाडे



मुद्दाम सुकविण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमध्ये चिंता वाढली असून परिसरातील हरित पट्ट्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे बोलले जात आहे. अनेक वर्षांपासून उभी असलेली झाडे अचानक कोमेजल्याने पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

### दोषींवर कठोर कारवाई करावी

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे. वन विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच संबंधित प्रशासनाने घटनास्थळी पाहणी करून झाडे सुकण्यामागील नेमके कारण शोधावे आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते SUSHIL RK यांनी केली आहे.

---

## पालिका मुख्यालयासमोर जाहीर मुंडण आंदोलनाने खळबळ

**जन सम्राट टाईम्स**

**कल्याण | प्रतिनिधी:** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनातील कथित भ्रष्टाचार, अनियमितता आणि अधिकाऱ्यांच्या निष्क्रिय भूमिकेविरोधात पुन्हा एकदा आंदोलन पेटले आहे. रहिवासी तसेच शिवसेना ग्राहक संरक्षण पक्षाचे पदाधिकारी ऋतुकांचन शंकर रसाळ यांनी ११ मेपासून आमरण उपोषण सुरू केले असून प्रशासनाच्या निषेधार्थ पालिका मुख्यालयासमोर जाहीर मुंडण आंदोलनही केले. सहाय्यक आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह मिळालेल्या माहितीनुसार, केडीएमसीच्या ‘४ ज’ विभागातील सहाय्यक आयुक्त सविता हिले यांच्या कार्यपद्धतीविरोधात स्थानिक नागरिकांकडून वारंवार गंभीर तक्रारी करण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही खासगी विकासक आणि बांधकाम व्यावसायिकांना प्रशासनाकडून पाठबळ दिले जात



असून सर्वसामान्य रहिवाशांवर अन्याय केला जात असल्याचा आरोप आंदोलनकर्ते ऋतुकांचन रसाळ यांनी केला आहे.

“धोकादायक” इमारतींच्या नावाखाली दबाव?

काही प्रकरणांमध्ये नागरिकांच्या मालकीची घरे जाणीवपूर्वक “धोकादायक” घोषित करून रहिवाशांवर दबाव टाकला जात असल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. तसेच अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना प्रशासन पक्षपाती भूमिका घेत असल्याचाही आरोप करण्यात आला.

रेरा माहिती नसल्याने फसवणुकीची भीती

संबंधित गृहनिर्माण प्रकल्पांबाबत आवश्यक माहिती फलक नसणे, रेरा नोंदणी क्रमांक उपलब्ध नसणे यामुळे फ्लॅट खरेदी करणाऱ्या नागरिकांची फसवणूक होण्याची शक्यता असल्याचे रसाळ यांनी निदर्शनास आणून दिले. या सर्व प्रकरणांबाबत नगर रचना विभाग तसेच संबंधित प्रशासनाकडे अनेक वेळा लेखी तक्रारी करण्यात आल्या. मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

### आयुक्तांवर दुर्लक्षाचा आरोप

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी या गंभीर प्रकरणांकडे सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत यापूर्वी सहा दिवसांचे आमरण उपोषण करण्यात आले होते. मात्र त्यानंतरही कोणतीही कारवाई न झाल्याने पुन्हा एकदा आंदोलन छेडण्यात आले असून आज उपोषणाचा सहावा दिवस आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा ऋतुकांचन रसाळ यांनी दिला आहे.

---

## बेकायदेशीर माती उत्खननावर धडक छापा

### पाच डंपर आणि दोन जेसीबी जप्त; टोकावडे पोलिसांकडून गुन्हा दाखल

**जन सम्राट टाईम्स**

**मुरबाड | प्रतिनिधी:** मुरबाड तालुक्यात सुरू असलेल्या बेकायदेशीर माती उत्खननाविरोधात प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. तहसीलदार अभिजित देशमुख यांनी धडक कारवाई करत पाच डंपर आणि दोन जेसीबी जप्त केले असून संबंधितांवर टोकावडे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आदिवासी भागात सुरू होते अवैध उत्खनन

मिळालेल्या माहितीनुसार, तालुक्यातील आदिवासी भागातील झाडघर पठार आणि माळ पठार परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून




मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर माती उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाकडे करण्यात येत होत्या. मात्र, कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण होते. काही ठिकाणी चिरीमिरीमुळे संबंधितांवर कारवाई होत नसल्याचाही आरोप नागरिकांकडून केला जात होता. तहसीलदारांची अचानक धडक कारवाई या पार्श्वभूमीवर तहसीलदार अभिजित देशमुख यांनी कडक भूमिका घेत अचानक छापा टाकला. यावेळी अवैधरित्या माती उत्खनन आणि वाहतूक करणारे पाच डंपर व दोन जेसीबी प्रशासनाने ताब्यात घेतले. या कारवाईमुळे बेकायदेशीर उत्खनन करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. कठोर कारवाईचा इशारा जप्त करण्यात आलेल्या वाहनांवर पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून, बेकायदेशीर माती उत्खनन करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा तहसीलदार अभिजित देशमुख यांनी दिला आहे. दरम्यान, प्रशासनाच्या या कारवाईचे स्थानिक नागरिकांकडून स्वागत करण्यात येत असून अवैध उत्खनन पूर्णपणे बंद करण्याची मागणी होत आहे.

---

## टोल व डिझेल दरवाढीमुळे जनता त्रस्त

### शिवसेना उबाठावतीने दरवाढीचा निषेध



**जन सम्राट टाईम्स**

**धुळे | प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे आणि परराष्ट्र नीतीमुळे देश महागाईच्या खाईत लोटला गेला असून, गॅस व इंधन दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे, असा आरोप करत शिवसेना उबाठा गटाच्या वतीने धुळे शहरातील शिवतीर्थ चौकात जोरदार घोषणाबाजी करत निषेध आंदोलन करण्यात आले. पेट्रोलचे दर १०७ रुपये तर डिझेलचे दर ९४ रुपयांपर्यंत पोहोचल्याने वाहतूक खर्चात मोठी वाढ होणार असून, त्याचा परिणाम सर्व जीवनावश्यक वस्तूंवर होणार असल्याची प्रतिक्रिया आंदोलकांनी व्यक्त केली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका करत म्हटले की, नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना तेल, गॅस कमी वापरण्याचा तसेच सोने खरेदी व परदेश दौरे टाळण्याचा सल्ला दिला. मात्र स्वतः मोठ्या मोटारींच्या ताफ्यासह रोड शो करत असून त्यानंतर लगेच युरोप दौऱ्यावर रवाना झाले. त्यामुळे सरकारच्या कथनी आणि करणीमध्ये मोठा फरक असल्याचा आरोप करण्यात आला. यावेळी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळातील आर्थिक परिस्थितीचा उल्लेख करत सध्याच्या केंद्र सरकारच्या धोरणांवरही निशाणा साधण्यात आला. इराण-अमेरिका-इस्राईल संघर्षामुळे देशावर आर्थिक संकट ओढावू शकते, असे अर्थतज्ज्ञ सांगत असतानाही केंद्र सरकारने योग्य पूर्वनियोजन केले नसल्याचा आरोप करण्यात आला.

निवडणुका संपल्यानंतर लगेच

### केंद्र सरकार विरोधात संताप व्यक्त

शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत केला. हे आंदोलन शिवसेना संपर्कप्रमुख अशोक धात्रक यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, निबा मराठे, नरेंद्र परदेशी, प्रशांत भदाणे, धीरज पाटील, संदीप सूर्यवंशी, शेखर वाघ, बाबाजी पाटील, हेमराज पाटील, प्रकाश वाघ, कुणाल कानकाटे, पंकज भारस्कर, मोहनसिंग तनवाणी, डॉ. अनिल पाटील, सुभाष मराठे, मुन्ना पठाण, शिवाजी शिरसाळे, मनोज बंब, आण्णा फुलपगारे, राजेंद्र ढवळे, दिनेश पाटील, आबा भडागे, कपिल लिंगायत, सुरज भावसार, सोमनाथ चौधरी, प्रदीप सूर्यवंशी, महादू गवळी, आनंद जावडेकर, प्रशांत ठाकूर, शाना भाऊ माळी, अनिल चौधरी, रोहित धाकड, गोकुळ बडगुजर, गुलाब सोनवणे, सागर निकम, ज्यादिप मराठे, प्रवीण साळवे, शुभम मटकर, वैभव पाटील, इश्तियाक अन्सारी, योगेश पाटील, सोमेश कानकाटे, निलेश कांजरेकर, किशोर सपकाळे, राजू पाटील, गजेंद्र पाटील, तेजस सपकाळ, संजय पाटील, मनोज पाटील, चंद्रकांत हजारे आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## गॅस सिलेंडरसाठी नागरिकांचा उद्रेक!

### तासन्तास वाट पाहूनही सिलेंडर न मिळाल्याने शिंदखेड्यात रास्ता रोको

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे :** घरगुती गॅस सिलेंडरच्या तुटवड्यामुळे शिंदखेडा परिसरात नागरिकांचा संताप अनावर झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी नागरिकांनी पहाटेपासूनच एजन्सीसमोर गर्दी केली होती. मात्र तासन्तास रांगेत उभे राहूनही अनेकांना सिलेंडर न मिळाल्याने वातावरण चांगलेच तापले. विशेष म्हणजे गॅससाठी लागलेल्या रांगा तब्बल अर्धा किलोमीटरपर्यंत गेल्या होत्या. भर उन्हात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह अनेकजण गॅस सिलेंडरच्या प्रतीक्षेत उभे होते.

मात्र अपुरा साठा आणि नियोजनाच्या अभावामुळे अनेक नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागले. गॅस सिलेंडर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. “पहाटेपासून रांगेत उभे आहोत, पण अजूनही सिलेंडर मिळालेला नाही,” अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. गॅस एजन्सीकडून कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने नागरिकांचा संताप अधिक वाढला. अखेर संतप्त नागरिकांनी शिंदखेडा-दोंडाईचा मुख्य रस्ता रोखून रास्ता रोको आंदोलन सुरू केले. यावेळी प्रशासन आणि गॅस एजन्सीविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

रस्ता रोकोमुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. नागरिकांचा आक्रोश आणि संतप्त प्रतिक्रिया यामुळे



### महागाईत भर, नागरिक त्रस्त

पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या दरांमुळे आधीच सर्वसामान्य नागरिक आर्थिक तणावात आहेत. त्यात आता घरगुती गॅस सिलेंडर वेळेवर मिळत नसल्याने नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. प्रशासनाने तातडीने गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी नागरिकांशी चर्चा करत त्यांची समजूत काढली. त्यानंतर काही वेळाने आंदोलन मागे घेण्यात आले आणि वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली.

भर उन्हात महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसह अनेकजण गॅस सिलेंडरच्या प्रतीक्षेत उभे होते. मात्र अपुरा साठा आणि नियोजनाच्या अभावामुळे अनेक नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागले. गॅस सिलेंडर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली. “पहाटेपासून रांगेत उभे आहोत, पण अजूनही सिलेंडर मिळालेला नाही,” अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. गॅस एजन्सीकडून कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने नागरिकांचा संताप अधिक वाढला. अखेर संतप्त नागरिकांनी शिंदखेडा-दोंडाईचा मुख्य रस्ता रोखून रास्ता रोको आंदोलन सुरू केले.

